Adfactors Public Relations
knowledge-driven communications

**PUBLICATION NAME** : LOKSATTA
PUNE VRUTANT

**CITY WHERE IT APPEARED** : PUNE

**DATE** :30—8--- 2010

**PAGE NO** : 5

---

# लोणावळ्यात उभा राहतोय दीड लाख चौरस फुटांचा मॉल

**लोणावळा, २९ ऑगस्ट / वार्ताहर**

पर्यटनाचे मध्यवर्ती ठिकाण म्हणून महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर नावलौकिक असणाऱ्या लोणावळा या थंड हवेच्या मध्यवर्ती भागात 'लोणावळा स्क्वेअर' नावाचा प्रशस्त मॉल दीड लाख चौरस फूट जागेत उभा राहत आहे. मुंबई-पुण्यासारख्या मोठ्या शहरात आढळणारे मॉल आता या निमित्ताने लोणावळ्यातही पाहावयास मिळणार असल्याने लोणावळ्याच्या नावलौकिकात वाढ होणार आहे.




**लोणावळा शहरात उभ्या राहत असलेल्या 'लोणावळा स्क्वेअर' या शॉपिंग मॉलचे छायाचित्र.**

मुंबईतील एक आघाडीवरील विकसक म्हणून नावलौकिक असलेल्या धनलक्ष्मी बिल्डर्स यांनी या शॉपिंग मॉलचे काम हाती घेतले असून ते प्रगतिपथावर आहे.

तर या मॉलच्या विकसनाकरिता भारतातील पहिली बुटीका मॉल ॲडव्हर्टायजरी कंपनी म्हणून ओळख असणारी बियॉण्ड स्क्वेअरफिट ॲडव्हर्टायजरी प्रा. लि. ही लक्ष केंद्रित करणार आहे.

लोणावळा या गिरिस्थानी पहिल्याच उभारल्या जाणाऱ्या या मॉलसंबंधी माहिती देण्याकरिता आयोजण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना बियॉण्ड स्क्वेअरफिटचे चीफ मॉल, मॅकेनिक सुशील डुंगरवाल यांनी ही माहिती दिली. या विषयी अधिक बोलताना डुंगरवाल यांनी सर्वसामान्य लोणावळाकर व परिसरातील ग्राहकांना केंद्रबिंदू मानून ही शॉपिंग मॉलची संकल्पना राबवण्यात आली असल्याचे सांगितले.

र लोणावळा या लहान शहरात मॉल चालवताना य मॉलमध्ये रिटेलर म्हणून येणारे भाडेकरू व स्थानिक तसेच राष्ट्रीय स्तरावरील अग्रेसर रिटेलर्स यांचे संतुलित मिश्रण साधणे हे सर्वांत मोठे आव्हान पेलायचे असल्याचे त्यांनी सांगितले.

फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात सुरू होईल असा विकसकांचा दावा आहे. ■